**वादी यांचा पुढील सरतपास–**

**वादीतर्फे विधिज्ञ श्री.एस.ए.झान्टये यांचे मार्फत शपथेवर सुरु –**

१. मी प्रस्तुतकामी कुलअखत्यारपत्राची मुळ प्रत दाखल केलेली आहे. सदरचे कुलमुखत्यारपत्र हे दि.१५.१०.१९९० रोजीचे असून, ते जनार्दन गावडे व शिवाजी सरंबळकर यांनी मला अधिकार दिल्याबाबतचे आहे. ते मला दाखविलेस मी ते ओळखू शकतो. आता साक्षीदारास निशाणी क्र.५१, अनु.क्र.३ कडील मुळ कुलअखत्याराची प्रत दाखविणेत आली. साक्षीदार सांगतो की, ती तीच आहे. सदरची प्रत ही तहसिलदार कार्यालयाकडे नोंदणीकृत असल्याने त्यास पुढील **निशाणी क्र.७५** देणेत येते. प्रस्तुतकामी मी जिल्हाधिकारी यांच्या आदेशाची प्रत दाखल केलेली आहे. ती मला दाखविलेस मी ती ओळखू शकतो. सदर आदेशाची प्रत मला देण्यात आलेली होती. सदरची प्रत वादीस कोणत्या अधिकारात दिली, हा प्रश्न खुला ठेवून आदेशास ओळखीकरीता **निशाणी क्र.७६** देण्यात येते. त्यासोबत मी हात नकाशाची मुळ प्रत जोडलेली आहे. ती मला दाखविलेस मी ती ओळखू शकतो. त्यावर शिवाजी वासुदेव गावडे यांची सही आहे. सदरची सही ओळखण्याचे कारण म्हणजे ते माझ्या माहितीचे आहेत. सदर नकाशास ओळखीकरीता **निशाणी क्र.७७** देणेत येते. मी प्रस्तुतकामी प्रतिवादींना दिलेल्या नोटिशीची प्रत हजर केलेली आहे. सदरच्या लखोट्यांपैकी जर्नादन वासुदेव गावडे, सीताबाई शिवाजी गावडे, निता चंद्रक्रांत गोडे हे तीन लखोटे "मुदती अंती परत" अशा शेऱ्यासह परत आलेले आहेत. तसेच येसुबाई महादेव पालव यांचा लखोटा "डीसीज्ड" म्हणून परत आलेला आहे व काशीबाई गणपत वारंग यांचा लखोटा "लेफ्ट" म्हणून परत आलेला आहे. मुदती अंती

परत आलेले लखोटे न्यायालयासमोर वादी व प्रतिवादीतर्फे विधिज्ञ यांचेसमक्ष खुले करण्याची परवानगी दिली. त्यातून नोटिशींच्या प्रती बाहेर काढण्यात आल्या. साक्षीदाराने सदर प्रती या त्याच मुळ प्रती आहेत असे सांगितले. सदर मुळ प्रतिंना ओळखीकरीता पुढील **निशाणी अनुक्रमे ७८ ते ८०(दोन्ही धरुन)** देणेत येते.

**<u>सरतपास थोड्या वेळाकरीता थांबविणेत येतो.</u>**

**<u>सरतपास थोड्या वेळानंतर पुन्हा शपथेवर सुरु–</u>**

२. मी प्रतिवादींना साठेखताकरीता स्मरणपत्र पाठविलेले होते. त्याच्या स्थळप्रती याआधी दाखल केलेल्या आहेत. सदर स्मरणपत्राचे लखोटे त्यांनी स्विकारलेले नाहीत. त्यामुळे ते मला परत मिळालेले आहेत. सदर मुळ प्रती मी आजरोजी दाखल केलेल्या आहेत. त्या मला दाखविलेस मी त्या ओळखू शकतो. आता साक्षीदारास निशाणी क्र.०१ ते ०४ कडील पोहोच पावत्यांच्या मुळ प्रती दाखविणेत आल्या. साक्षीदार सांगतो की, त्या त्याच प्रती आहेत. सदर प्रतींना सार्वजनिक कागदपत्रे असल्याने पुढील **निशाणी क्र. अनुक्रमे ८१ ते ८४** देणेत येते.

३. आता साक्षीदारास ८०/५ कडील लखोटा दाखविणेत आला. सदरचा लखोटा काशीबाई वारंग यांना पाठविलेला असून, तो "लेफ्ट" या शेऱ्यासह परत मिळालेला आहे. तो तोच लखोटा आहे. त्यास पुढील **निशाणी क्र.८५** देणेत येते. सदर लखोट्यातून स्मरणपत्राची मुळ प्रत वादी व प्रतिवादीसमक्ष बाहेर काढण्यात आली. साक्षीदार सांगतो की, ती मुळ स्मरणपत्राची प्रत आहे. सदर स्मरणपत्राच्या प्रतीस पुढील **निशाणी क्र.८६** देणेत येते.

४. आता साक्षीदारास निशाणी क्र.८० सोबत असणारे ४/१९ लगत दाखल कागदपत्रे दाखविणेत आली. त्यामध्ये अनुक्रम नंबर १ व २ या प्रतिवादी यांना स्मरणपत्र प्राप्त

झाल्याबाबतच्या पोहोच पावत्या आहेत. त्यांना अनुक्रमे **निशाणी क्र.८७ व ८८** देणेत येते. सोबत प्रतिवादी सीताबाई गावडे, जनार्दन सरंबळकर व काशीबाई वारंग यांना पाठविलेल्या स्मरणपत्राचे परत आलेले लखोटे आहेत. सदर लखोटे हे "मालकांना इंटिमेशन दिलेले आहेत" अशा शेऱ्यासह व काशीबाई गणपत वारंग हिची नोटीस "लेफ्ट" या शेऱ्यासह परत मिळालेली आहे. ते तेच लखोटे आहेत. सदर लखोट्यांना अनुक्रमे **निशाणी क्र.८९, ९० व ९१** देण्यात येते. सदर लखोट्यांमधून स्मरणपत्रांच्या मुळ प्रती बाहेर काढण्यात आल्या. साक्षीदार सदर प्रती पाहून सांगतो की, त्या मुळ नोटिशीप्रमाणे बरोबर आहेत. सदर स्मरणपत्रांच्या मुळ प्रतींना अनुक्रमे **निशाणी क्र.९२, ९३ व ९४** देणेत येते.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपासाकरीता तहकूब–**

श्रवणोत्तर स्वीकृती

सही/–

(आर.जी.कुंभार)

दिनांक– १०/०३/२०२६

अति.सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),कुडाळ.